सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राबविल्या जाणा-या शारीरिक शिक्षण योजनेचे फायदे व येणा-या अडचणी यांचा विश्लेषणात्मक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत शारीरिक शिक्षण विषयातील विद्यावाचस्पती या पदवीसाठी सादर केलेली संशोधन रूपरेषा

संशोधक

सतिश दादा चोरमले

मार्गदर्शक

भास्कर रेड्डी

(पीएच .डी.)

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

अनुक्रमणिका

अ.नं	तपशील	पृष्ठ क्र .
१	प्रस्तावना	
२	समस्येचे स्पष्टीकरण	
३	संशोधनाचे महत्व	
४	संशोधन प्रश्न	
५	संशोधनाची उद्दिष्टे	
६	संशोधनाच्या परिसीमा	
७	संशोधन मर्यादा	
८	संशोधन गृहीतके	
९	संशोधन पद्धती	
१०	अभ्यास अभिकल्प	
११	जनसंख्या व न्यादर्श	
१२	संशोधन साधने	
१३	माहितीचे विश्लेषण साधने	
१४	संशोधन कार्यपद्धती	
१५	कार्यात्मक व्याख्या	
१६	मागील संशोधनाचा आढावा	
१७	संदर्भसूची	

प्रस्तावना :

शारीरिक शिक्षण म्हणजे फक्त शरीराचे नसून शरीर, मन व बुद्धी या तिन्हींचे शिक्षण आहे. या दृष्टीने प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत या विषयाचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. शारीरिक तंदुरुस्ती ही काळाची गरज असून हि पूर्ण करणे शाळा महाविद्यालये यांच्यापुढे खूप मोठे आव्हान आहे. बदलत्या जीवनशैलीतील परिणाम म्हणजे वाढते ताण-तणाव,बदलणारी सामाजिक ,आर्थिक परिस्थिती व त्यामुळे निर्माण होणारे रोग उदा. मधुमेह, रक्तदाब इ. या ताण-तणावांना यशस्वीरीत्या तोंड देणे, त्यांच्यावर योग्य पद्धतीने मत करण्यासाठी शारीरिक शिक्षण, व्यायाम, योगा व खेळ हे अत्यंत नैसर्गिक, अनोपचारिक व प्रभावी माध्यम आहे. (गंदगे,धुमाळ २००५)

सामंजस्य, राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव, सहकार्य याबरोबरच जिद्द, चिकाटी, सहनशीलता, आत्मविश्वास, चारित्र्य यांचे संवर्धन करणे ही उद्दिष्टे साध्य होण्यासाठी शारीरिक शिक्षणाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्याची गरज निर्माण झाली आहे. (आलेगावकर २००६) म्हणूनच आज प्रत्येक शाळा, महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षण विषयाचे महत्व वाढत आहे. त्यामुळेच अलीकडील काळामध्ये भारतामध्ये पर्यायाने महाराष्ट्रात याकडे सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होत आहे.

आजच्या महाविद्यालयीन तरूण-तरुणींची जीवनशैली, वर्तन हे व्यसनाधीनतेकडे वळत असताना त्यांच्या जीवनशैलीमध्ये सामंजस्य, राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव, सहकार्य याबरोबरच जिद्द, चिकाटी, सहनशीलता, आत्मविश्वास, चारित्र्य संवर्धन व्हावे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी शारीरिक शिक्षण योजना राबविण्यास सुरुवात केली आहे.

समस्येचे स्पष्टीकरण :

शारीरिक ही आज काळाची गरज असून ती पूर्ण करणे शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाद्वारे शक्य आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गेल्या वर्षापासून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी शारीरिक शिक्षण योजना सुरु केली आहे . या योजनेची ध्येय व उद्दिष्टे ही शारीरिक शिक्षणाला अनुसरून आहेत. शारीरिक शिक्षण हा शिक्षणाचाच एक भाग व्हावा या माध्यमातून महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना महाविद्यालयातील विद्यार्थी हा सुदृढ आरोग्य, शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असला पाहिजे. त्याचबरोबर त्याच्यामध्ये सामंजस्य, राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव, सहकार्य याबरोबरच जिद्द, चिकाटी, सहनशीलता, आत्मविश्वास, चारित्र्य यांचे संवर्धन करणे इ गोष्टी त्याने अंगी बाळगल्या पाहिजे. या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांच्या अंगी निर्माण व्हाव्या म्हणून एक साचेबंध आराखडा विद्यापीठाने तयार केला असून हा अभ्यासक्रम महाविद्यालयामध्ये प्रभावीपणे राबविण्याचे त्यांनी ठरविले आहे. (sppu २०१५) त्यांनी ठरविलेली ध्येये व उद्दिष्टये साध्य झाली आहेत का हे जाणून घेणे गरजेचे आहे.

या योजनेमुळे विद्यार्थांच्या दैनदिन जीवनातील वेगवेगळया समस्या शारीरिक, मानसिक थकवा ताण-तणाव कमी होण्यास मदत झाली आहे का नाही हे जाणून घेण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर जो घटक ही योजना राबवित आहे तो म्हणजे शारीरिक शिक्षण संचालक त्याला ही योजना राबविताना काही अडचणी येत येत आहेत का व सदर योजनेची अंमलबजावणी तो कशा पद्धतीने राबवित आहे. त्यांच्या मनात या योजनेविषयी काही संभ्रम आहेत का हे ही जाणून घेणे गरजेचे वाटते. या योजनेचा आणखी एक उद्देश विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे व शारीरिक शिक्षण केवळ खेळापुरते मर्यादित न राहता सर्वांपर्यंत पोहचणे हे सुध्दा आहे. त्यासाठी त्यांनी प्रात्यक्षिक परीक्षेची तरतूद केली असून विद्यार्थ्यांची शारीरिक सुदृढता मूल्यमापन

कसोट्या दिलेल्या आहेत त्याला अनुसरून मानके आहेत का ? आणि ती नसतील तर जी मानके दिली आहेत त्याची बांधणी करता येईल. त्यामुळे संशोधकाने ‘ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राबविल्या जाणाऱ्या शारीरिक शिक्षण योजनेचा विश्लेषणात्मक अभ्यास करावयाचे ठरविले आहे ’.

संशोधनाचे महत्व :

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा हा अभ्यासक्रम राबविण्याचा हा उपक्रम खरोखरच स्तुत्य आहे, सदर संशोधनाचे महत्व पुढील प्रमाणे सांगता येईल.

१ .सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास त्यांनी राबविलेल्या शारीरिक शिक्षण योजनेचे

यश अपयश विद्यापीठास निदर्शनास आणून देण्यास मदत होईल.

२ .सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने राबविलेल्या योजनेचा अभ्यास केल्यामुळे या

योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल झाले असल्यास ही सदर योजना पुढील वर्गांसाठी राबवावी अशी शिफारस करता येईल.

३. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने राबविलेल्या योजनेचा अभ्यास केल्यामुळे या योजनेच्या माध्यमातून विध्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल झाले असल्यास ही सदर योजना महाराष्ट्रातील इतर विद्यापीठातही राबविली जावी अशी शिफारस करता येईल.

४. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने राबविलेल्या योजनेचा अब्यास केल्यामुळे शारीरिक शिक्षण संचालकांना हा अभ्यासक्रम राबविण्यामध्ये कोणत्या अडीअडचणींना सामोरे जावे लागले याची माहिती प्राप्त करून

घेतल्यामुळे जाणवलेल्या त्रुटींचा अभ्यास करून त्यावर उपाय योजना सुचविल्या जातील त्यामुळे ही योजना अधिक प्रभावीपणे राबविता येईल.

५. महाविद्यालयीन विद्यार्थी – विद्यार्थिनींसाठी शारीरिक सुदृढतेच्या मानकांची बांधणी केल्यामुळे ते इतर घटकांसाठी ही उपयोगी ठरतील.

संशोधन प्रश्न :

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या शारीरिक शिक्षण योजनेचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्याचे संशोधकाने ठरविले असताना प्रस्तुत समस्येला अनुसरून पुढील प्रश्न आहेत.

१. शारीरिक शिक्षण योजनेचे स्वरूप व रचना कशा प्रकारची आहे?

२. महाविद्यालयीन स्तरावर ती राबविताना सदर योजनेची अंमलबजावणी कशा प्रकारे केली जाते ?

३. ज्यांच्यासाठी ही योजना तयार केली अशा प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांवर तिचा परिणाम झाला आहे का ?

४. ज्यांच्यासाठी ही योजना तयार केली आहे अशा प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना या योजनेविषयी समस्या आहेत का ? असतील तर कोणत्या ?

५. सदर योजना महाविद्यालयामध्ये कशा प्रकारे राबविली जाते ?

६. सदर योजना महाविद्यालयामध्ये राबविताना अडचणी येतात का ?

७. सदर योजना राबविण्यासाठी महाविद्यालयांकडे मानवी व भौतिक संसाधने पुरेशी आहेत का ?

८. महाविद्यालयामध्ये ही योजना राबविताना शारीरिक शिक्षण संचालकांना कोणकोणत्या अडचणी येतात ?

९. या योजनेविषयी शारीरिक शिक्षण संचालकांचे मत कशा प्रकारचे आहे ?

१०. सदर योजना राबविण्यासाठी शारीरिक शिक्षण संचालकाने वेळापत्रक कशा प्रकारे बनविले आहे ?

११. या योजनेच्या प्रात्यक्षिक परीक्षेचे मूल्यमापन योग्य होते का ?

१२. या योजनेचे मूल्यमापन करताना महाविद्यालयाच्या परीक्षा विभागाची भूमिका काय असते ?

१३. ही योजना राबविताना शारीरिक शिक्षण संचालकांना सहाय्यक म्हणून कोण असते व त्याची जबाबदारी काय आहे ?

१४. योजना राबविण्यासाठी जी शारीरिक सुदृढतेची मानके दिली आहेत ती कोणत्या प्रकारची आहेत ?

१५. योजना राबविण्यासाठी जी शारीरिक सुदृढतेची मानके दिली आहेत ती योग्य आहेत का ?

१६. योजना प्रभावी राबविण्यासाठी अजून कोणत्या गोष्टींचा समावेश करता येईल ?

१७. शारीरिक शिक्षण योजना राबविण्याचा उद्देश साध्य झाला आहे का ?

१८. सदर योजना राबवित असताना विद्यापीठाची भूमिका काय आहे ?

संशोधनाची उद्दिष्टे

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या शारीरिक शिक्षण योजनेचा अभ्यास करणे.

२. शारीरिक शिक्षण योजना राबविताना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

३. शारीरिक शिक्षण योजनेविषयी विद्यार्थी – विद्यार्थिनींचा दृष्टीकोन अभ्यासणे.

४. शारीरिक शिक्षण योजनेविषयी शारीरिक शिक्षण संचालक व तज्ञ व्यक्तींची मते जाणून घेणे.

५. महाविद्यालयीन विद्यार्थी – विद्यार्थिनींसाठी मूल्यमापन योजना तयार करणे.

संशोधनाच्या परिसीमा :

सदर संशोधनासाठी संशोधकाने पुढीलप्रमाणे परिसीमा निश्चित केलेल्या आहेत.

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या शारीरिक शिक्षण योजनेपुरतेच आहे.

२. संशोधन हे पुर्णतः ज्यांच्यासाठी अभ्यासक्रम तयार केला त्याच वर्गापुरते मर्यादित असेल.

३. संशोधन हे पुर्णतः प्रथम वर्षासाठी तयार केलेला अभ्यासक्रम, विद्यार्थी, शारीरिक शिक्षण संचालक व या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती यांच्याशी निगडीत असेल.

संशोधनाच्या मर्यादा :

सदर संशोधनासाठी संशोधकाच्या पुढील मर्यादा आहेत

१. मुलाखतीदरम्यान तज्ञ व्यक्ती प्रतीसाद्कांची मानसिकता ही संशोधनाची मर्यादा होय.

२. प्रश्नावली भरून घेतेदरम्यान विद्यार्थी – विद्यार्थिनी प्रतीसाद्कांची मानसिकता ही देखील संशोधनाची मर्यादा होय.

३. प्रश्नावली भरून घेतेदरम्यान शारीरिक शिक्षण संचालक प्रतीसाद्कांची मानसिकता ही देखील संशोधनाची मर्यादा होय.

संशोधनाची गृहीतके :

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षण योजना राबविली जाते.

२. निवडलेल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी – विद्यार्थिनी चर्चेमध्ये सहभागी होऊन निवडक विद्यार्थी – विद्यार्थिनी प्रश्नावलीस योग्य प्रतिसाद देतील.

३. निवडलेल्या महाविद्यालयातील सर्व शारीरिक शिक्षण संचालक प्रश्नावालीस योग्य प्रतिसाद देतील.

४. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण योजनेची माहिती विद्यापीठ अभ्यासक्रम पुस्तिकेतून व परिपत्रकातून प्राप्त होईल.

संशोधन पद्धती

सदर संशोधनासाठी संशोधक मिश्र संशोधन पद्धतीचा अवलंब करणार आहे . यामध्ये संशोधक गुणात्मक संशोधन व संख्यात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करणार आहे. जेव्हा संशोधन समस्येच्या समाधानासाठी किंवा संशोधन प्रश्नाच्या निराकरणासाठी कोणतीही एकमेव आधार सामुग्री पुरेशी नसते आणि संशोधन समस्येचे यथार्थ आणि तपशीलवार स्पष्टीकरणासाठी गुणात्मक आणि संख्यात्मक आधार सामुग्रीचे संमिश्रण गरजेचे असते. (पंडीत २००९)

अभ्यास अभिकल्प

क्रेसवेल यांनी मिश्र संशोधन पद्धतीचे एकूण सहा प्रकार सांगितले आहेत.(जोन्स,ब्राऊन,२०१४) यापैकी संशोधक अन्वेषणात्मक अनुक्रमिक अभिकल्पाचा (Exploratory Sequential Design) वापर करणार आहे.

याप्रकारच्या आराखड्यामध्ये पहिल्या टप्यात गुणात्मक आधार सामुग्री संकलित करून तिचे विश्लेषण केले जाते. यामध्ये गुणात्मक आधार सामुग्रीला अग्रक्रम असतो.

दुसऱ्या टप्यामध्ये संख्यात्मक आधार सामुग्री संकलित केली जाते. व तिचे विश्लेषण केले जाते . यातून प्राप्त होणा-या माहितीच्या आधारे विश्लेषण व अर्थनिर्वचन करणार आहे. थोडक्यात अन्वेषणात्मक आनुक्रमिक अभिकल्प पुढीलप्रमाणे आहे.



जनसंख्या व न्यादर्श

जनसंख्या

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत येणारे कार्यक्षेत्र हे पुणे जिल्हा, अहमदनगर जिल्हा व नाशिक जिल्ह्यामध्ये आहे. या तीन जिल्ह्याचे चार विभाग केलेले आहेत ते म्हणजे पुणे शहर विभाग, पुणे ग्रामीण विभाग, अहमदनगर विभाग व नाशिक विभाग असे चार विभाग आहेत या चारही विभागातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखा असणारी किंवा यापैकी एक किंवा दोन किंवा तीनही शाखा असणारी महाविद्यालये ही जनसंख्या म्हणून घेतली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या या चार विभागातील अशा संलग्नित महाविद्यालयांची संख्या ही ३७१ आहे व त्या सर्व महाविद्यालयामधील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील प्रथम वर्षाचे सर्व विद्यार्थी –विद्यार्थिनी हे या संशोधनासाठी जनसंख्या म्हणून निवडलेली आहे

न्यादर्श

न्यादर्शाचे संभाव्य न्यादर्श व असंभाव्य न्यादर्श असे प्रमुख दोन प्रकार आहेत. संशोधक संभाव्य न्यादर्श प्रकारातील बहुस्तरीय न्यादर्श पद्धतीची निवड करणार आहे. न्यादर्शात पुनः न्यादर्शन असेल तर त्याला बहुस्तरीय न्यादर्शन असे म्हणतात (कांगणे ,आहेर व महाडीक २०१४).

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर व नाशिक असे चार विभाग आहेत. या विभागाची निवड केल्यानंतर संशोधक या विभागातून फक्त कला, वाणिज्य व विज्ञान शाखा असणारी किंवा यापैकी एक किंवा दोन किंवा तीनही शाखा असणाऱ्या महाविद्यालयाची निवड करणार आहे. ही महाविद्यालये निवडताना शहरी, निमशहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयाची निवड करणार आहे. व यामध्येही दोन समान

गटात विद्यार्थी व विद्यार्थिनींचा समावेश असणार आहे. यासाठी न्यादर्शाची बहुस्तरीय पद्धती उपयुक्त आहे .

सदर संशोधनासाठी न्यादर्शाचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल .

अ.क्र	विभाग	निवडलेली महाविद्यालयांची संख्या	निवडलेली विद्यार्थी संख्या	निवडलेली विद्यार्थिनींची संख्या	शा.शि. संचालक	तज्ञ मार्गदर्शक
१	पुणे शहर	५	२५	२५	५	-
२	पुणे ग्रामीण	५	२५	२५	५	-
३	नाशिक	५	२५	२५	५	-
४.	अहमदनगर	५	२५	२५	५	-
एकूण	४ विभाग	२०	१००	१००	२०	१०

संशोधन साधने :

सदर संशोधन हे मिश्र पद्धतीने केले जाणार असल्यामुळे या संशोधनासाठी संशोधक माहिती संकलनासाठी पुढील साधने वापरणार आहे.

अ .क्र	संशोधन साधने	कोणासाठी	स्वरूप
१	मुलाखत	तज्ज्ञ मार्गदर्शक	निमसंरचित(semi-structured)
२	दस्तावेज	विद्यापीठ अभ्यासक्रम पुस्तिका व विद्यापीठ परिपत्रके	
3	फोकस ग्रुप	विद्यार्थी – विद्यार्थिनी	प्रत्येक गटात ८ ते १२ विद्यार्थी
४	प्रश्नावली	शारीरिक शिक्षण संचालक	मिश्र प्रश्नावली

संशोधक विद्यार्थी – विद्यार्थिनीशी चर्चा करणार असून व शारीरिक शिक्षण संचालकांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती प्राप्त करून घेणार आहे. तर तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती घेणार आहे. त्यांच्याकडून त्यांचा शारीरिक शिक्षण योजने विषयीचा दृष्टीकोन जाणून घेणार आहे. त्याचबरोबर दस्तावेज या माहिती संकलन साधनाद्वारे विद्यापीठाने जो अभ्यासक्रम तयार केला आहे त्या पुस्तिकेचा सखोल अभ्यास करून आपले निरीक्षण नोंदविणार व माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न करणार आहे. मुलाखती व चर्चेसाठी टेप रेकॉर्डर चा वापर केला जाईल.

माहितीचे विश्लेषण साधने :

गुणात्मक विश्लेषण :

गुणात्मक विश्लेषणासाठी माहितीचे संक्षिप्तीकरण (data reduction), संज्ञाकरण (coding), वर्गवारी (categorising),थीम्स या तंत्राचा वापर केला जाईल.

संख्यात्मक विश्लेषण :

वर्णनात्मक सांख्यिकीय व अनुमानात्मक सांख्यिकीमध्ये शततमक या तंत्राचा उपयोग करण्यात येईल.

संशोधन कार्यपद्धती :

सदर संशोधनामध्ये संशोधक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या शारीरिक शिक्षण योजनेचा विश्लेषणात्मक अभ्यास याच पद्धतीने करणार असून यामध्ये राबविलेली योजना कितपत यशस्वी झाली? व या योजनेचा विद्यार्थ्यांच्या शारीरिक आरोग्यावर किती प्रमाणात परिणाम झाला? त्याचबरोबर कसा परिणाम झाला? हे केवळ गुणात्मक पद्धतीने मोजमाप करता येईल तर ही योजना राबवित असताना कोणकोणत्या अडीअडचणी आहेत? यांचा अभ्यास करता येईल. त्याचबरोबर शारीरिक शिक्षण संचालक व तज्ञ व्यक्तींची मतेही जाणून घेता येतील. हे केवळ मिश्र पद्धतीचा अवलंब करून सदर समस्येचे अधिक चांगल्या प्रकारे आकलन करण्याच्या दृष्टीने या पध्दतीची निवड केली आहे.

कार्यात्मक व्याख्या :

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

यु .जी .सी .शी संलग्न असलेली पुणे येथील अशी शैक्षणिक संस्था की, ज्या ठिकाणी उच्च शिक्षण दिले जाते त्याचबरोबर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तयार करून त्याचे अध्यापन व मूल्यमापनही केले जाते याच शैक्षणिक संस्थेची पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालये संलग्नित असून त्यांचे कामकाज ही जिच्या मार्गदर्शनाखाली चालते अशी शैक्षणिक संस्था म्हणजेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ होय .

शारीरिक शिक्षण योजना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या शारीरिक आरोग्यामध्ये सकारात्मक बदल व्हावा म्हणून विद्यापीठाकडून महाविद्यालयामार्फत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राबविलेली योजना म्हणजेच शारीरिक शिक्षण योजना.

प्रथम वर्षाचे विद्यार्थी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१९ -२०२० मध्ये जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी वरीष्ठ महाविद्यालयात प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान यापैकी कोणत्याही एका शाखेत प्रवेश घेतात असे विद्यार्थी म्हणजे प्रथम वर्षाचे विद्यार्थी होय.

मागील संशोधनाचा आढावा :

महाजन आर. ए. (१९८७). नेपाळ मधील शाळेमध्ये क्रीडा सुविधा व शारीरिक शिक्षणाचे कार्यक्रम कसे आहेत यांचा अभ्यास केला आहे. सदर विषयाचे संशोधन हे नागपूर विद्यापीठामध्ये केले असून संशोधकाने पुढील निष्कर्ष काढले आहेत. नेपाळ मधील शाळेमध्ये शारीरिक शिक्षण ऐच्छिक विषय आहे .याची कारणे क्रीडा सुविधांची कमी वर्गातील विद्यार्थ्यांची अतिरिक्त संख्या, अपुरे मैदाने, अपु-या सुविधा, खूपच कमी शिक्षक प्रशिक्षित आहेत व पैशाची कमतरता आहे.

अक्रम के. आर. (१९९२). सदर संशोधन हे अमरावती विद्यापीठात झाले असून संशोधकाने अमरावती विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयामध्ये राबविल्या जाणाऱ्या शारीरिक शिक्षण योजनेचा चिकित्सक अभ्यास केला आहे. या संशोधनाच्या माध्यमातून संशोधकाने महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक शिक्षण उपक्रमाबद्दल नकारात्मक दृष्टीकोन आहे असे नमूद केले आहे. त्याच बरोबर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत नाही असेही निदर्शनास आणून दिले आहे .

मिश्रा (१९८०). यांनी ओरिसा राज्यामधील शारीरिक शिक्षनाची शाळा व महाविद्यालयातील सद्यस्थितीचे मूल्यमापन केले. १०० शाळा व महाविद्यालयातून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती गोळा केली. त्यामध्ये असे निष्पन्न झाले की, भरपूर शाळा व महाविद्यालयामध्ये त्यांच्या वेळापत्रकामध्ये शारीरिक शिक्षण विषयाचे नियोजनच केलेले नाही. त्याचबरोबर शारीरिक शिक्षण उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी शाळा व महाविद्यालयामध्ये आर्थिक स्रोत उपलब्ध करून देण्यासाठी कडक धोरण राबविणे गरजेचे आहे.अशा प्रकारचे निष्कर्ष काढले आहेत.

संदर्भ सूची

आगलावे प.रा (२०००)संशोधन पद्धतीशास्त्रव तंत्रे ,*विद्या प्रकाशन*. नागपूर.

मुळे रा.श, उमाठे वि.तु.(१९८७) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, *महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ,* पुणे.

गंदगे वि.तु., धुमाळ रा .वि .(२००५) शारीरिक शिक्षणशास्त्र, *मंगेश प्रकाशन* नागपूर.

आलेगावकर प. म.(२००६) शारीरिक शिक्षण. *दिलीपराज प्रकाशन*.पुणे.

Registrar. (2015), Manual for Physical Efficiency Test. Savitribai Phule Pune University, Pune.

कांगणे, एस. ए., आहेर एस. एस. आणि महाडीक, एस. (२०१४) शारीरिक शिक्षण. *निराली प्रकाशन*. पुणे.

Jones, I., Brown, L., Holloway, I. Qualitative Research in Sports and Physical Activity. SAGE Publication Ltd. Delhi.